**( सभापतीस्थानी : माननीय सभापती )**

अधिवेशनाचा शुभारंभ " वंदेमातरम् " या गीताच्या गायनाने झाला.

**नियम 289 च्या प्रस्तावा बाबत**

**सभापती** : प्रश्नोत्तरे..

श्री.पांडुरंग फुंडकर : अध्यक्ष महाराज, नियम 289 अन्वये मी आपल्याकडे एक नोटीस दिली आहे. या राज्यातील कापूस उत्पादक शेतक-यांच्या कापसाचा मागचा हंगाम पूर्ण झाला आहे. त्या हंगामामध्ये जवळजवळ दीड हजार कोटी क्विंटल कापूस महाराष्ट्र सरकारने खरेदी केला आहे. कापूस उत्पादक शेतक-यांकडील कापूस खरेदी करण्यात आला होता. आंबा उत्पादक शेतक-यांनासुध्दा सरकारने मागच्या अधिवेशनात आश्वासन दिले होते. धान उत्पादक शेतक-यालासुध्दा सरकारकडून पैसे घेणे आहेत. या शासनाने कापसाचा भाव जाहीर केला होता. मागच्या विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळी कॉंग्रेस पक्षाने या राज्यातील शेतक-याच्या कापसाला 2700 रुपये भाव देऊ असे सांगितले होते. आमचे सरकार आले तर हा भाव नक्कीच देऊ अशा प्रकारे त्यांनी आश्वासन देऊन या राज्यातील जनतेची मते घेतली होती ...............

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी एवढेच सांगू इच्छितो की,सभागृहातील सदस्यांच्या हिताच्या दृष्टीने प्रश्नोत्तराचा तास हा अत्यंत महत्वाचा आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर :अध्यक्ष महाराज, त्याही पेक्षा हा प्रश्न महत्वाचा आहे.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी माझे वाक्य समजावून घ्यावे.प्रश्नोत्तराचा तास हा अत्यंत महत्वाचा आहे.तसेच सन्माननीय सदस्यांच्या हक्काचा तास आहे. म्हणून मला असे वाटते की, आपण प्रश्नोत्तराचा तास पूर्ण करु या. विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 खाली जी नोटीस दिलेली आहे ती नोटीस मला मिळाली आहे. त्यामधील विषय अत्यंत गंभीर आहे याची मला जाणीव आहे. या विषयावर अन्य कोणत्या मार्गाने आपणास चर्चा करणे शक्य आहे या अनुषंगाने विचार करणे आवश्यक आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर :अध्यक्ष महाराज, या राज्यातील जनतेचेच प्रश्न आम्ही प्रश्नोत्तराच्या माध्यमातून या ठिकाणी उपस्थित करीत असतो.प्रश्नोत्तराच्या तासामध्ये जे प्रश्न असतात त्यापेक्षा देखील हा प्रश्न अत्यंत गंभीर आणि महत्वाचा आहे.कापूस उत्पादक शेतक-याला द्यावयाचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

11-07-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A 2
VTG/ MHM/ SBT/ 14:00

श्री.पांडुरंग फुंडकर ......

बोनसचा पहिला हप्ता जून मध्ये देण्यात येईल आणि दुसरा हप्ता दिवाळीमध्ये देण्यात येईल असे सरकारने जाहीर केले होते. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी मिशीला तूप लावून या सभागृहात मागच्या अधिवेशनात घोषणा केली होती. त्याचबरोबर राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी असे सांगितले होते की, एक महिन्याच्या आत हे पैसे देऊ.आता जून महिना संपून गेला आहे.आज सुध्दा 16 जिल्हयात पाऊस नाही.त्यामुळे या भागातील शेतक-यांच्या पेरण्या झालेल्या नाहीत.काही शेतक-यांनी कोरड्या जमिनीमध्ये पेरण्या केल्या आहेत.त्यामुळे दुबार तिबार पेरण्या करण्याचे संकट या शेतक-यांवर आलेले आहे. माननीय पणनमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, कापूस उत्पादक शेतक-यांना सरकारकडून एक हजार कोटी रुपये घेणे आहेत. त्या रकमेवर आपण शेतक-यांना व्याज देत नाही आणि त्यांचे पैसे सुध्दा देत नाही. त्यामुळे या राज्यातील शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत. मागच्या महिन्यात बुलढाणा जिल्हयातील सहा शेतक-यांनी आत्महत्या केल्या असून मी त्यांच्या घरी जाऊन आलो आहे. कापसाचे पैसे त्यांना मिळालेले नाहीत तसेच पेरणीची व्यवस्था नाही त्यामुळे त्यांच्या समोर संकट निर्माण झाले असून त्यांची अवस्था दयनीय झालेली आहे. शेतक-यांच्या बाबतीत सरकार फक्त घोषणा देत असते तसेच बोलघेवडेपणा करीत असते परंतु प्रत्यक्षात मात्र त्यांना पैसे देत नाही.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/ MHM. श्री. गायकवाड नंतर --- 14:05

श्री. फुंडकर ....

तसेच कोकणातील आंबा उत्पादक शेतकरी आहे त्यालाही हेक्टरी 10 हजार रुपयांपर्यंत मदत देऊ असे सांगितले होते पण त्या शेतकऱ्यांनाही ही मदत दिली गेलेली नाही. भंडारा, गोंदिया तसेच कोकणातील भात उत्पादक शेतकऱ्याला देखील आश्वासन देऊन काही मदत शासनाकडून दिली गेलेली नाही किंबहुना विदर्भातील शेतकऱ्यांना 6 कोटी रुपये शासनाकडून घेणे आहे. अध्यक्ष महाराज, हे राज्य शेतकऱ्यांचे राज्य आहे. शेतकऱ्यांच्या नावाने कुंकू लावून तुम्ही येथे राज्य चालविण्यास बसला आहात. पण त्याच शेतकऱ्याची मात्र शासनाने फसवणूक चालविली आहे. त्याला आश्वासन देऊनही शासनाने मदत दिली नाही, पैसे दिले नाहीत. कापसाचे पैसे देऊ म्हणून नगारा पिटून सांगण्यात आले पण प्रत्यक्षात त्याला ते पैसे दिलेले नाहीत. त्याचा विश्वासघात या शासनाने केलेला आहे. तेव्हा राज्यातील एकंदर सर्वच दृष्टीने शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा हा प्रश्न असल्यामुळे सभागृहातील इतर सर्व चर्चा थांबवून राज्यातील कापूस, आंबा आणि भात उत्पादक शेतकऱ्यांच्या या प्रश्नावर तातडीने चर्चा व्हावा असा प्रस्ताव मी आपल्याकडे दिलेला आहे त्याचा विचार करावा आणि शेतकऱ्यांच्या या महत्त्वाच्या प्रश्नावर तातडीने चर्चा घडवून आणावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : माननीय सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेता श्री. फुंडकर यांनी नियम 289 नुसार जो प्रस्ताव येथे मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. जे मंत्री महोदय शासनाच्या वतीने या सदनामध्ये आश्वासन देतात, त्यावर टाळ्या मिळवितात, बाके वाजविली जातात आणि राज्यातील शेतकऱ्यांचे केवळ आम्ही भले करतो असे म्हणतात पण प्रत्यक्षात मात्र त्याच्या विरुद्ध या शासनाचे वर्तन असते. माननीय सभापती महोदय, आम्ही या ठिकाणी जनतेचे प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करतो हे सत्य आहे. त्यासाठीच आम्ही येथे प्रश्न देत असतो हेही निश्चित आहे. परंतु यामध्येही शेतकरी वर्ग हा महत्त्वाचा घटक आहे आणि त्याला शासनाने आश्वासन दिल्याप्रमाणे मदत वा पैसे मिळणार नसतील o त्यामुळे शेतकऱ्याचे हाल होणार असतील, होत असतील तर ते कोणी पहावयाचे ? शासन या सदनामध्ये घोषणा करते आणि नंतर त्याकडे पाठ फिरविली जाते, तो एक करमणुकीचा विषय केला जातो. सभापती महोदय, या सदनामध्ये एखादी गोष्ट शासनाने मान्य केली असेल तर त्याचा आदर राखणे हे शासनाचे कर्तव्य आहे, ती शासनाची जबाबदारी आहे. खरे म्हणजे हे सदर सुरू होण्यापूर्वी

...... बी 2 ..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार ....

सरकार तर्फे जाहीर करावयास पाहिजे होते की, मागील अधिवेशनामध्ये सरकारने घोषणा केल्या प्रमाणे शेतकऱ्यांचे पैसे चुकते केलेले आहेत आणि दिवाळीमध्ये योग्य वेळी उरलेले पैसेही आम्ही देऊ. परंतु तसे न होता विरोधी पक्षातर्फे जोपर्यंत प्रश्न येथे उपस्थित केला जात नाही तोपर्यंत शासन त्या प्रश्नाकडे शांतपणे पहात राहते. अधिवेशन आल्यानंतर त्यावर थोडी फार चर्चा होते पुन्हा त्याबाबत शासनाकडून घोषणा केल्या जातात आणि सारे जण पुन्हा आपापल्या मार्गाने चालू लागतात. अशा प्रकारे या महाराष्ट्र राज्याचा कारभार चालला आहे. जनतेचे प्रश्न विचारात घ्यायचेच नाहीत. केवळ घोषणाबाजी करावयाची आणि दुसरे काही सुचलेच नाही तर मग डान्स बार सारखे विषय काढून त्यावर चर्चा करावयाची. सभापती महोदय, शेतीच्या माध्यमातून शेतकरी आपली उपजीविका करतो आहे, आणि अशा वेळी जेव्हा त्याला मदतीची अपेक्षा असते त्यावेळी सरकारने जर त्याच्याकडे पाठ फिरविली तर त्याचेवर आत्महत्येचे पाळी येते. तीच परिस्थिती राज्यातील शेतकऱ्यांवर आलेली आहे. अशा प्रसंगी शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या की, त्याने कर्जापायी आत्महत्या केली आहे, व्यसनाधीन झाल्यामुळे आत्महत्या केली आहे असे वर्णन करून शेतकऱ्यांना एक प्रकारे कमीपणा आणावयाचा ही जी शासनाची नीती आहे ती वाईट आहे. खरे म्हणजे शेतकरी आत्महत्या करीत असेल तर त्या मागील कारणे शासनाने शोधली पाहिजेत. सभापती महोदय, या निमित्ताने मला आपणास एवढेच सांगावयाचे आहे की, या दृष्टीने हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे, गंभीर आहे आणि तितकाच तातडीचा देखील आहे. हा सगळा विचार करूनच आम्ही हा प्रस्ताव नियम 289 खाली दिलेला आहे. या विषयापेक्षा प्रश्नोत्तराचा तास महत्त्वाचा नाही म्हणून हा प्रश्न प्रथम आपण चर्चेला घ्यावा, त्यासाठी आजचा प्रश्नोत्तराचा तास स्थगित ठेवावा अशी माझ्या पक्षातर्फे मी आपणास विनंती करतो. सभापती महोदय, शासन भरपूर आश्वासने देईल, पण त्याची अमलबजावणी होत नाही. तेव्हा शासनाने देखील जी आश्वासने आपण पूर्ण करू शकू अशीच आश्वासने द्यावीत. एकदा आश्वासन दिल्यानंतर त्याचा मान राखणे हे शासनाचे कर्तव्य आहे. त्या दृष्टीकोनातून आपण या विषयाकडे पाहिले पाहिजे. त्यासाठी आजचा हा प्रश्नोत्तराचा तास स्थगित ठेवून नियम 289 खाली दिलेला प्रस्ताव आपण चर्चेला घ्यावा या माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केलेल्या विनंतीला मी पाठिंबा देतो.

...... बी 3 ...



KBS/ SBT/ MHM. श्री. गायकवाड नंतर --- 14:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : माननीय सभापती महोदय, आपण सांगितल्याप्रमाणे या सभागृहामध्ये प्रश्नोत्तराचा तास हा अतिशय महत्त्वाचा आहे. आपल्या या भावनेशी आम्हीही सगळे सहमत आहोत. परंतु या सदनामध्ये माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी माझ्या प्रश्नाला, लक्षवेधी सुचनेला, उत्तर देताना असे आश्वासन दिले होते .....

( यानंतर श्री.जागडे ....सी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

की, " एक महिन्यांत शासन कापूस उत्पादक शेतक-यांचे पैसे देईल. " राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील तसेच पणनमंत्र्यांनी आश्वासन दिले आहे. शेतक-यांचे कापसाचे पैसे त्वरीत दिले पाहिजेत, असा आमचा आग्रह आहे. कारण शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत, तसेच शेतकरी आत्महत्या करीत आहेत. शेतक-यांची अवस्था अतिशय वाईट आहे. माननीय उपमुख्यमंत्री आणि पणनमंत्री जर आपण दिलेली आश्वासने पाळत नसतील तर ते बरोबर नाही. शेतकरी आज आत्महत्या करीत आहेत, त्याला जबाबदार कोण आहे ? सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासाच्या निमित्ताने आम्ही जनतेचे प्रश्न या सभागृहात मांडत असतो. परंतु कापसाचा हा प्रश्न देखील अतिशय महत्वाचा असल्यामुळे आज प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन कापसाच्या विषयावर चर्चा सुरु करावी, अशी मागणी आम्ही करीत आहोत. माननीय विरोधी पक्षनेते श्री.भाऊसाहेब फुंडकर म्हणाले, त्याप्रमाणे माननीच उपमुख्यमंत्र्यांनी मिशीला तूप लाऊन घोषणा केली होती. आता पणनमंत्री तेल लाऊन घोषणा करणार आहेत काय ? माझा प्रश्न असा आहे की, आपण या राज्यातील गरीब कापूस उत्पादक शेतक-यांना तेल आणि तूप का लावता ? त्यांना अर्थमंत्री पैसे देत नाहीत काय ? अर्थमंत्री माननीय उपमुख्यमंत्री महोदय तसेच पणनमंत्र्यांची फजिती करीत आहेत काय ? कापसाच्या महत्वाच्या विषयावर शासन लक्ष न देता डान्सबारकडे लक्ष देत आहे. आता त्या बाबत जी काही कारवाई करावयाची असेल ती शासनाने करावी. खुशाल शासनाने डान्स करावा.

श्री. वसंत काळे ( खाली बसून ) : माननीय सदस्यांनी विषयावर बोलावे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी मा. सदस्य श्री. वसंत काळे यांच्या भावनेशी सहमत आहे. श्री. वसंत काळे मराठवाड्यातील आहेत. आता मराठवाड्यातील कापूस उत्पादक शेतक-यांचे पैसे शासनाने द्यावयाचे नाहीत काय ? अर्थमंत्री श्री. जयंत पाटील पैसे देत नाहीत काय ? त्यांना पैसे देण्यामध्ये काही संकोच वाटत आहे काय ? अर्थमंत्र्यांचा याला विरोध आहे काय ? यामध्ये कोणती अडचण आहे ? आम्ही ज्यावेळी हा प्रश्न या सदनात उपस्थित केला होता, तेव्हा तूप लाऊन राणा भिमदेवी थाटात माननीय उपमुख्यमंत्र्यांनी घोषणा केली होती की, एक महिन्यांच्या आत राज्यातील कापूस उत्पादक शेतक-यांचे पैसे देण्यात येतील. सभापती महोदय, सभागृहात दिलेल्या आश्वासनाची पूर्ती जर होणार नसेल आणि शेतकरी अजून आत्महत्या करीत





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.....

असतील तर ही गंभीर बाब आहे. सभापती महोदय, आज तर कापूस उत्पादक शेतक-यांची परिस्थिती अतिशय बिकट आहे. राज्यातील अनेक शेतक-यांना दुबार पेरणी करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. म्हणून राज्यातील कापूस उत्पादक शेतक-यांना आज संरक्षण देण्याची आवश्यकता आहे. दुसरी बाब अशी की, राज्याचे फलोत्पादन मंत्री श्री. विनय कोरे यांनी कोकणातील शेतक-यांना हेक्टरी 10 हजार रुपयाची मदत जाहीर केली होती. ही रक्कम सुध्दा कोकणातील शेतक-यांना देण्यात आली नाही. भंडारा, तुमसर इत्यादि भागातील धान उत्पादक शेतक-यांना सुध्दा शासनाने मदत जाहीर केली होती. नागपूरच्या अधिवेशनात धान उत्पादन शेतक-यांना शासनाने मदत जाहीर केली होती. असे असतानाही अजूनपावेतो धान उत्पादक शेतक-यांना कसलीही मदत मिळाली नाही. धान उत्पादन शेतकरी, कापूस पिकविणारा शेतकरी विदर्भातील असल्यामुळे त्याला ही मदत देता येत नाही काय ? कोकणातील आंबा पिकाचे उत्पादन घेण्या-या गरीब शेतक-यांना सुध्दा शासन मदत देत नाही. सभापती महोदय, या सभागृहाचे पावित्र्य आहे. या सभागृहात जी आश्वासने दिली जातात, त्यांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. सभापती महोदय, कापूस उत्पादक शेतक-यांचा हा प्रश्न अतिशय महत्वाचा असल्यामुळे या विषयावर चर्चा सुरु करावी आणि त्याबाबत सरकारने आपले उत्तर द्यावे. तसेच कापूस उत्पादक शेतक-यांना त्वरीत पैसे उपलब्ध करुन द्यावे, अशी विनंती मी करीत आहे.

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर व विविध पक्षाच्या गटनेत्यांनी कापूस उत्पादक शेतक-यांचा महत्वाचा प्रश्न असल्यामुळे आजचा प्रश्नोत्तराचा तास स्थगित करावा, अशी मागणी केली आहे. मला याबाबतीत माननीय सदस्यांना वस्तुस्थिती सांगावयाची आहे. प्रश्नोत्तराचा तास हा अतिशय महत्वाचा आहे. या तासाला अनन्य साधारण महत्व आहे आणि हे अनन्य साधारण महत्व आपण सर्वजण जपत आहोत.

( यानंतर श्री. सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मा. सभापती...**

त्या अनुषंगाने माझी आपणास विनंती आहे की, आपण नियम 289 अन्वये प्रस्ताव देऊन त्या संबंधीचे आपले म्हणणे सभागृहामध्ये मांडले आहे. आपण मांडलेला विषय हा सुध्दा सार्वजनिकदृष्टया अत्यंत महत्वाचा असल्यामुळे सत्ताधारी व विरोधी पक्षाकडील माननीय सदस्यांना विनंती करतो की, प्रश्नोत्तरांचा तास संपल्यानंतर नियम 289 अन्वये आपण मांडलेल्या विषयाला न्याय मिळण्याच्या दृष्टीने अडीच तासाची अल्पकालीन चर्चा घडवून आणली तर त्या विषयाला न्याय मिळू शकतो. त्या दृष्टीने या बाबतीत माझे हे रुलिंग आहे. आणि म्हणून मी.....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण आता या ठिकाणी रुलिंग दिले आहे. प्रश्नोत्तराचा तास महत्वाचा तास आहे हे आम्हालाही मान्य आहे. या सदनातील सर्व माननीय सदस्यांचा महत्वाचा तास आहे हे आम्हाला मान्य आहे. परंतु या सदनामध्ये बसलेले माननीय सदस्य हे शेवटी जनतेमधून निवडून आलेले सदस्य आहेत. या सभागृहामध्ये प्रश्नोत्तराच्या माध्यमातून आम्ही जनतेचे प्रश्न मांडीत असतो. आणि म्हणून हा देखील जनतेच्या दृष्टीने महत्वाचा प्रश्न आहे. अन्नदात्या शेतकऱ्याच्या दृष्टीने महत्वाचा प्रश्न आहे. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, हा शेतकऱ्यांचा प्रश्न असल्यामुळे महाराष्ट्रातील एंटायर आंबा उत्पादक, धान उत्पादक, कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्वाचा प्रश्न आहे. म्हणून आपण सभागृहाचे कामकाज स्थगित करुन या विषयावर चर्चा घडवून आणावी.

.....डी 2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**प्रश्नोत्तरे**

**पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे**

**कोरेगांव (जि.सातारा) जवळ जैन धर्म गुरु व त्यांच्या सेवकांना केलेली दमदाटी**

**(१) * ५५६७ प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील :** सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील कोरेगांव जवळ जैन धर्मगुरु व त्यांच्या सेवकांना दमदाटी करुन जैन धर्मास वर्ज्य असलेला (मांसाहारी) अभक्ष आहार देण्याचा प्रयत्न काही समाजकंटकानी केल्याचे निषेधार्थ सांगली जिल्हाधिकारी कार्यालयावर जैन समाज बांधवानी दिनांक ४ जून, २००५ रोजी मोर्चा काढला होता हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे,

(३) उक्त मागण्यांबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर.आर.पाटील यांच्याकरिता: (1) होय.

(२) सदर गुन्ह्यातील आरोपींना कठोर शासन व्हावे, असे मागण्यांचे स्वरुप आहे.

(३) गुन्ह्यातील आरोपींवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय,....

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्य उभे राहून घोषणा देतात.)

(गोंधळ)

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, सातारा जिल्हयातील कोरेगाव जवळ जैन धर्मगुरुंना काही समाजकंटकांनी....

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्य उभे राहून घोषणा देतात.)

(गोंधळ)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.5567....**

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, प्रश्न असा आहे की, काही समाजकंटकांनी जैन धर्मगुरु व सेवकांवर हल्ला केला. त्यांना जबरदस्तीने मांसाहार देण्याचा प्रयत्न केला. त्या समाजकंटकांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे असे मंत्रिमहोदयांनी छापील उत्तरामध्ये सांगितले आहे. प्रश्न असा आहे की, या प्रतिबंधक कारवाईचे स्वरुप काय आहे? ते समाजकंटक कोण होते? त्यांच्यावर कोणती कारवाई करण्याचा शासनाचा विचार आहे?

(गोंधळ)

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्य वेलमध्ये उभे राहून घोषणा देतात.)

सभापती : विरोधी पक्षाच्या माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, आपण सर्वांनी आपापल्या जागेवर कृपया जावून बसावे. आपल्या भावना मला समजल्या आहेत. त्या बाबतीत मी नियम 289 अन्वये अल्पकालीन चर्चा घेण्यास तयार आहे...

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(घोषणा)

**सभापती** : सभागृहात अशा पध्दतीने कामकाज करणे अशक्य आहे. म्हणून मी सभागृहाचे कामकाज 15 मिनिटांसाठी तहकूब करतो.

(सभागृहाची बैठक 2.20 वाजता 15 मिनिटांसाठी तहकूब झाली.)

----

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

**(सभापतीस्थानी मा.सभापती)**

(मा.विरोधी पक्ष सदस्यांकडून घोषणा देण्यात येतात.)

**सभापती** : आता प्रश्नोत्तरे सुरु करू. तारांकित प्रश्न क्रमांक 5567 या प्रश्नावर सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील प्रश्न विचारतील.

(घोषणा देण्यात येतात.)

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य आपापल्या जागा सोडून बाहेर येतात.)

(घोषणा देण्यात येतात.)

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अंतर्गत प्रश्नोत्तराचा तास स्थगित करून कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा घेण्यात यावी अशी मागणी केली. त्या संदर्भात आपण अडीच तासाची चर्चा करण्याचे मान्य केल्यानंतर पुन्हा विरोधी पक्षाकडून अशाप्रकारे घोषणा देऊन कामकाजामध्ये अडथळा आणण्याचे काम सुरु आहे. माझी विनंती आहे की, आपण कामकाज पुढे सुरु ठेवावे.

**सभापती** : नियम 289 अन्वये चर्चा आज होईल. परंतु प्रश्नोत्तराचा तास आज झाला नाही तर नियम 289 अन्वयेची चर्चा होणार नाही. मी यापूर्वी तशाप्रकारे सांगितलेले आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : आपण कामकाज पुढे सुरु ठेवावे अशी विनंती आहे.

**सभापती** : मी या संबंधाने मघाशी सांगितलेले आहे. कृपया सन्माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये पावित्र्य राखावे. सन्माननीय सदस्य श्री.शरद पाटील यांनी प्रश्न विचारावा.

(मा.श्री.हर्षवर्धन पाटील यांना उद्देशून घोषणा देण्यात येतात.)

...(अडथळा)....

प्रा.शरद पाटील : समाजकंटकांनी जैन साधूंवर हल्ला करून....

(विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांकडून घोषणा देण्यात येतात.)

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय श्री.गडकरी साहेबांनी माझ्या नावाचा उल्लेख केलेला आहे. आपण मला संरक्षण द्यावे. ..(अडथळा).. या सभागृहामध्ये कापूस एकाधिकार खरेदी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना हमी भावाची रक्कम दिली गेलेली आहे. आता अग्रीम 1च्या बाबतीत 535 कोटी रुपयाची तरतूद करण्याचे ठरविलेले आहे. त्यातील 80 कोटी रुपयाचे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील (पुढे चालू...

वाटप सुरु झालेले आहे. राहिलेल्या रक्कमेचे वाटप देखील या आठ दिवसामध्ये करण्याची व्यवस्था आम्ही केलेली आहे, हे मला सांगायचे आहे. राजकारण न करता पैशाचे वाटप करत आहोत.

श्री.नितीन गडकरी : आपल्यावर आमचा विश्वास नाही.

श्री.हर्षवर्धन पाटील : 80 कोटी रुपयाचे वाटप सुरु झालेले आहे. राहिलेले 450 कोटी रुपये 8 दिवसामध्ये देण्याची व्यवस्था राज्य सरकारच्या वतीने केलेली आहे.

श्री.नितीन गडकरी : आमचा यावर विश्वास नाही.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभागृहामध्ये जे आम्ही बोलतो ते आम्ही करून दाखवितो. अशा पध्दतीने दादागिरी चालणार नाही. सभापती महोदय, आज यांना कामकाज करायचे नाही म्हणून हे असे बोलत आहेत, हे बरोबर नाही. माझ्या नावाचा सन्माननीय श्री.गडकरी साहेबांनी तीन वेळा उल्लेख केला म्हणून मी हे सांगू इच्छितो.

(घोषणा देण्यात येते.)

श्री.हर्षवर्धन पाटील : ही दादागिरी चाललेली आहे.

...(अडथळा)...

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MHM/ प्रथम श्री.किल्लेदार.. 14:40

श्री. हर्षवर्धन पाटील...

सभापती महोदय,अग्रीमाच्या बाबतीत 80 कोटी रुपयाचे वाटप सुरु झालेले आहे. राहिलेल्या 450 कोटी रुपयाचे वाटप आठ दिवसात करण्याची व्यवस्था शासनाने केलेली आहे.

( विरोधी पक्षातील माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

सभापती : सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी त्यांचा प्रश्न विचारावा.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, ज्यांनी जैन सांधूंना मांसाहार करायला लावण्याचा प्रयत्न केला. . .. . .

( विरोधी पक्षातील माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

(माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी व विरोधी पक्षाचे माननीय सदस्य "खोटी आश्वासने देऊन मराठवाडयातील शेतक-यांचा विश्वासघात करणा-या पणन मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांचा धिक्कार असो" अशी घोषणा देतात.)

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे......

( विरोधी पक्षातील माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, विरोधी पक्षातील सर्व माननीय सदस्य विहिरीमध्ये उतरलेले आहेत. सन्माननीय सदस्यांना अशा प्रकारे विहिरीमध्ये उतरता येणार नाही. आपण त्यांना त्यांच्या जागेवर बसावयास सांगावे. हे सर्व सन्माननीय सदस्य विहिरीमध्ये कशासाठी उतरलेले आहेत?

( विरोधी पक्षातील माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री. विनोद तावडे :सभापती महोदय, माननीय, मंत्री महोदय,श्री. हर्षवर्धन पाटील यांनी ठिकाणी अशाी रीतीने मध्येच सभागृहात उभे राहून शासनाची भूमिका कशी काय स्पष्ट केली ?

सभापती :माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांना मी नियम 289 अन्वये बोलण्यास परवानगी दिली. त्यानंतर आता माननीय मंत्रिमहोदय, श्री. हर्षवर्धन पाटील यांनी बोलण्यास परवानगी मागितली, मी त्यांना बोलण्यास परवानगी दिली. त्यानंतर मंत्रिमहोदय, श्री. हर्षवर्धन पाटील यांनी शेतक-यांच्या कापसाच्या अग्रिमाबाबत शासनाने या क्षणापर्यंत केलेली कार्यवाही या ठिकाणी सांगितली. माझ्या परवानगीनेच माननीय मंत्रिमहोदय, श्री. हर्षवर्धन पाटील यांनी या ठिकाणी वक्तव्य केलेले आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे :सभापती महोदय, कापसाच्या अग्रिमाच्या बाबतीत श्री. नितीन गडकरी साहेब या ठिकाणी बोलले त्या अनुषंगाने माननीय मंत्रिमहोदय या ठिकाणी बोलले आहेत.

( विरोधी पक्षातील माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री. हर्षवर्धन पाटील :सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, या सदनामध्ये सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव मांडला त्याबाबत आपण रुलिंग दिलेले आहे.शेतक-यांच्या कापसाच्या प्रश्नाच्या संदर्भात प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर चर्चा करु असे सांगितलेले आहे. या ठिकाणी विरोधी पक्षातील सदस्यांनी जाणूनबुजून कामकाज न करण्याचे धोरण ठरविलेले आहे.

( विरोधी पक्षातील माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, शासनाने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केलेली. आहे. आठ कोटी रुपयाचे वाटप चालू झालेले आहे. राहिलेल्या पैशांचे वाटप आठ दिवसात करण्याची शासनाने व्यवस्था केलेली आहे


( विरोधी पक्षातील माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

सभापती : सभागृहात अशा पध्दतीने कामकाज करणे अशक्य आहे. म्हणून मी सभागृहाचे कामकाज 20 मिनिटांसाठी तहकूब करीत आहे.

( यानंतर सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 43 मिनिटांनी 20 मिनिटांसाठी तहकूब झाली.)

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही


20050711G - Microsoft Word
File Edit View Insert Format Tools Table Window Help Reporting Reporter Miscellaneous
Type a question for help
P.H. M.H. P.H./M.H. Copy Header New Page
Normal + Justif DVBW-TTYogeshEN 16
श्री. हर्षवर्धन पाटील :
Draw AutoShapes
Page 2 Sec 1 2/2 At 0.6" Ln 1 Col 30 REC TRK EXT OVR
Start 20050711G - Microsof...
3:18 PM

असुधारित प्रत /

( स्थगितीनंतर )

( सभापतीस्थानी माननीय सभापती )

**पृ.शी.**: शोक प्रस्ताव.

**मु.शी.**: डॉ. रफिक झकेरिया व श्री. सलिमुद्दीन काझी यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

श्री. हर्षवर्धन पाटील ( संसदीय कार्य मंत्री ) : सभापती महोदय, डॉ. रफिक झकेरिया, माजी विधान परिषद सदस्य व मंत्री तसेच श्री. सलिमुद्दीन काझी, माजी विधान परिषद सदस्य यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

" डॉ. रफिक झकेरिया, माजी विधान परिषद सदस्य व मंत्री तसेच श्री. सलिमुद्दीन काझी, माजी विधान परिषद सदस्य यांच्या दुःखद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दुःख व्यक्त करते. "

( प्रेस : येथे सोबत जोडलेले दिवंगत सदस्यांचे अल्प चरित्र छापावे )

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, सन्माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी मरहुम डॉ.रफिक झकेरिया, माजी वि.प.स. आणि मंत्री आणि मरहुम सलिमुद्दिन काझी, माजी वि.प.स.यांच्या निधनासंबंधी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे. माझ्यादृष्टीने डॉ.झकेरिया यांची इस्लामचे पुरोगामी भाष्यकार म्हणून राज्याला ओळख होती. मौलाना एज्यूकेशन सोसायटीमध्ये सर्वधर्मियांना प्रवेश कसा मिळेल यासाठी त्यांचे सतत प्रयत्न चालले होते. ख-या अर्थाने सर्वधर्मियांच्या भावनांची ही पावती होती. केवळ मुसलमान समाजामध्ये नव्हे तर इतर समाजामध्ये त्यांची प्रतिमा वरच्या स्तरावर होती. त्यामुळे भारत सरकारने त्यांच्या कार्याची दखल घेऊन युनोच्या व्यासपीठावर भारताची बाजू मांडण्यासाठी त्यांना पाठविले होते. भारत सरकारने त्यांना युनोमध्ये एकदा नाही तर तीन वेळा पाठविले होते. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळामध्ये जवळपास 15 वर्षे विविध खात्याचे मंत्री म्हणून त्यांनी प्रभावी कामगिरी केली आहे. डॉ.झकेरिया हे मूळचे औरंगाबादचे होते. औरंगाबाद जिल्हयाचे खरे शिल्पकार कोणाला म्हणावयाचे असेल तर ते डॉ.रफिक झकेरिया यांना म्हटले तर ते वावगे होणार नाही.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर पुढे सुरु...)

औरंगाबादमध्ये सिडको, हुडको यांच्या मार्फत अनेक बांधकामे करुन औरंगाबाद हे झपाट्याने वाढणारे शहर म्हणून त्यांनी प्रसिध्दीस आणले. विमानतळ, औद्योगिक वसाहती, शिक्षण संस्था इत्यादी बाबतीत त्यांनी शहराला सतत अग्रेसर ठेवले. अशा त-हेने देश आणि विदेशातही विख्यात असलेल्या सच्चा भारतीयाचे दिनांक 9 जुलै 2005 रोजी हृदयविकाराच्या झटक्याने दु:खद निधन झाले. त्याच प्रमाणे मरहुम सलिमुद्दीन काझी हे सुध्दा या सभागृहाचे सदस्य होते त्यांचेही दिनांक 8 मे 2005 रोजी दु:खद निधन झाले. मी भारतीय जनता पक्षाच्यावतीने आणि माझ्या तर्फे या दोघांनाही आदरांजली अर्पण करतो आणि या शोकप्रस्तावाला पाठिंबा देतो.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. खंदारे

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सदनाचे संसदीय कार्यमंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांनी या ठिकाणी जो शोकप्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. एक अतिशय दु:खद घटना म्हणजे डॉ. रफिक झकेरिया हे पैगंबरवासी झाले. महाराष्ट्रामध्ये जे कोणी विचारवंत होते, विद्वान होते, सर्व धर्मामध्ये समभाव राहावा, हिंदू आणि मुसलमान या दोन्ही समाजाचे संबंध अतिशय चांगले राहावेत, पाकिस्तानची सुध्दा निर्मिती होऊ नये असे ज्या विद्वान मुसलमान पुढा-यांना वाटत होते त्यांच्या पैकी ते एक होते. हिंदुस्थान आणि पाकिस्तानची निर्मिती झाली त्यावेळी सुध्दा त्यांनी जे विचार मांडलेले होते ते अतिशय महत्वाचे आहेत. हिंदु आणि मुस्लिम एकत्र राहिले तर देशाची कशी जास्त प्रगती होऊ शकेल, सर्वांना कसा समान न्याय मिळेल, समान दर्जा मिळेल या विषयी त्यांनी लिखान केले, पुस्तके लिहिली, आपले विचार व्यक्त केले. ते एकूण तीन वेळा संभाजीनगरमधून -ज्याला आपण औरंगाबाद म्हणतो- विधानसभेवर निवडून आले आणि त्यावेळी ते जेंव्हा मंत्रिमंडळात होते त्यावेळी औरंगाबादचा कायापालट करण्यात त्यांचा पुढाकार होता. ज्या मतदारसंघातून एखादी व्यक्ती जेव्हा निवडून येते त्यावेळी त्या व्यक्तीच्या नजरेसमोर काही ध्येय असले पाहिजे, माझ्या मतदार संघासाठी अमूक अमूक गोष्टी मी करीन अशा प्रकारची निश्चित रुपरेषा नजरेसमोर ठेवावी लागते, तशी ती त्यांनी ठेवली होती. मी जेव्हा 1985मध्ये संभाजीनगर शहरात गेलो आणि संघटना उभी करण्याच्यादृष्टीने चाचपणी करण्यास सुरुवात केली त्यावेळी डॉ. रफिक झकेरिया यांची भेट झ ाली. मी त्यांच्याशी बोललो. ते मला म्हणाले की, तुम्हाला येथे काम करायला भरपूर वाव आहे. येथील मुस्लिम रझाकारांच्या विरोधात आहेत, त्याचा तुम्हाला फायदा मिळेल. खरे म्हणजे, हिंदू आणि मुस्लिम यांच्यामध्ये मतभेदांची दरी निर्माण होऊ नये अशा मताचे ते होते. ते म्हणाले जनता ही रझाकारांना त्रासलेली आहे, त्याठिकाणी पोलिसांचा देखील त्रास आहे. या सर्व पार्श्वभूमीवर तुम्हाला निश्चितच यश येईल, असे त्यांनी मला सांगितले. त्यामुळे मी जास्त आत्मविश्वासाने कामाला सुरुवात केली आणि त्यांचे शब्द खरे ठरले. आज संभाजीनगर संपूर्णपणे शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाच्या पाठिशी उभा आहे. काही वेळा एखाद दुस-या पक्षाची व्यक्ती निवडून येऊ शकते. परंतु निवडणुकीच्या तंत्राच्या दृष्टीने विचार केला तर तेथील वातावरण हे शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाला पोषक आहे. या संभाजीनगरचे जे चित्र डॉ. झकेरिया यांनी आपल्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...)

नजरेसमोर रेखाटले होते ते पूर्ण करण्यासाठी त्यांनी मंत्री असताना कसोशीने प्रयत्न केले. असे हे व्यक्तिमत्व आज काळाच्या पडद्याआड गेले त्याचे दु:ख होते. कोणतीही व्यक्ती कोणत्या जातीची, धर्माची आहे हे महत्वाचे नाही तर त्या व्यक्तीकडून होणारे काम हे राष्ट्राला, राज्याला आणि समाजाला किती पोषक आहे, ज्या खेड्यातून व्यक्ती जन्माला येते त्या खेड्यासाठी किती पोषक आहे या गोष्टीला अनन्य साधारण महत्व असते आणि अशा व्यक्तीं पैकी डॉ. रफिक झकेरिया हे एक होते. ते गेल्यामुळे महाराष्ट्राचे मोठे नुकसान झालेले आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार..

एक चांगले विचारवंत म्हणून त्यांची ख्याती होती. डॉ. रफिक झकेरिया यांनी मध्यंतरी एक पुस्तिका छापली. त्यांनी प्रत्येक वेळी विचार व्यक्त केले की, काही जरी असले तरी हिंदु आणि मुसलमान या दोन समाजाकडे पाहण्याच्या दृष्टीकोन हा सगळयांचा समान असला पाहिजे. मुंबईतील सन 2000 सालापर्यन्तच्या झोपडपट्टया रेग्युलाईज करण्याचा संदर्भात त्यांना प्रश्न विचारला गेला होता त्यावेळी त्यांनी उत्तर दिले की, तुम्ही या शहरातील झोपडपट्टयांना किती वर्षे संरक्षण देणार आहात ? या झ ोपडपट्टयांना अशाच प्रकारचे संरक्षण दिले गेले तर मुंबई शहर भविष्यात उध्वस्त होण्याची शक्यता आहे, म्हणून शासनाने गांभीर्याने याबाबतीत विचार करावा अशा प्रकारची सूचना त्यांनी केली होती. याचा अर्थ असा आहे की, ते पुरोगामी विचारसरणीचे असल्यामुळे समाजासमोर उभे रहाण्याची त्यांची पध्दत ही धर्माला धरुन नव्हती तर ती विकासाला धरुन होती. जी व्यक्ती विकासाचा विचार करते ती व्यक्तीच राज्याचा व देशाचा विकास करु शकते. जर राज्याचा विकास झाला नाही तर राज्याची कधीही प्रगती होणार नाही अशा विचारांनी त्यांनी या राज्यात काम केलेले आहे. अशा थोर विचारवंतांचे निधन झाल्यामुळे मी खरोखरच दु:ख व्यक्त करतो.

सभापती महोदय, श्री.मरहुम सलिमुद्दीन काझी, माजी वि.प.स. यांचा जन्म 27 नोव्हेंबर,1930 रोजी झाला आणि 8 मे, 2005 रोजी ते पैगंबरवासी झाले. त्यांचे शिक्षण बी.ए.एल.एल.बी.पर्यन्त झाले होते. या सदनामध्ये सदस्य म्हणून आल्यानंतर, माझी आपणाकडून एकच अपेक्षा आहे की, या ठिकाणी काम केल्याचा थोडा तरी ठसा आपण आपल्या पश्चात ठेवला पाहिजे. आपल्याला या ठिकाणी काय मिळते ? मला वाटते आपण आपल्या कामाचा ठसा आपल्या पश्चात ठेवणे हीच एक मोठी देणगी आहे. सदनातील एखादी व्यक्ती जगातून निघून गेली तर त्या सदस्याची कमीत कमी या सभागृहामध्ये, मग ते विधानसभा असो, विधान परिषद असो अथवा लोकसभा असो, त्या-त्या सभागृहांमध्ये त्या सदस्याची आठवण ठेऊन त्याला श्रध्दांजली अर्पण केली जाते आणि हीच एक मोठी कमाई आहे. एखाद्या सदस्याचे निधन झाल्यास, त्या सदस्याने सभागृहात केलेल्या कामकाजाचा उल्लेख करुन त्याच्या दुखवटयाचा प्रस्ताव त्यांच्या कुटुंबियांना पाठविला जातो. इतर कोठेही नोंद घेतली जात नसली तरी सदस्याने केलेल्या कामाची नोंद या ठिकाणी घेतली जाते. या ठिकाणी त्याच्या कामाची नोंद घेतली म्हणजे सर्व महाराष्ट्राने त्याच्या

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

कामाची नोंद घेतली असा त्याचा अर्थ होतो. सलिमुद्दीन काझी यांचे 8 मे,2005 रोजी निधन झ ाले. या दोन्ही व्यक्ती महाराष्ट्र विधानमंडळाच्या सभागृहात नेहमी कार्यरत राहिल्या. त्यांनी त्यांच्या जीवनात केलेली कामे ही नेहमीच चिरंतन राहतील, तसेच त्यांची स्मृती देखील चिरंतन राहील अशी अपेक्षा व्यक्त करुन या ठिकाणी जो शोकप्रस्ताव मांडला आहे, त्या प्रस्तावाशी मी, माझा पक्ष सहमत आहोत. या महान वक्त्यांना आम्ही विनम्र श्रध्दांजली अर्पण करतो व माझे दोन शब्द पुरे करतो.

------------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, सन्माननीय संसदीय कार्य मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांनी श्री. मरहुम सलिमुद्दीन काझी आणि डॉ. रफिक झकेरिया,माजी विधान परिषद सदस्य यांच्या निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी आणि माझ्या सद्‌भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. डॉ. रफिक झकेरिया यांचा आणि माझा परिचय 1972 या वर्षापासून झालेला आहे. स्व. वसंतराव नाईक हे महाराष्ट्र राज्याचे अनेक वर्षे मुख्यमंत्री होते. नंतरच्या काळात घटनेमध्ये वारंवार बदल होत गेले त्यामुळे मंत्रिमंडळाची संख्या किती असावी यासंदर्भातील निर्णय घेतला गेला. स्व.वसंतराव नाईक ज्यावेळी मुख्यमंत्री होते त्यावेळचा काळ असा होता की, सभागृहात कॉंग्रेस पक्षाचे नेहमी बहुमत असावयाचे. अशी परिस्थिती असतानाही त्यांच्या कालावधीत मंत्रिमंडळात 10 ते 15 पेक्षा जास्त मंत्री नव्हते. त्यावेळी मंत्री, राज्यमंत्री आणि उप मंत्री अशी मंत्रिमंडळात त्रिस्तरीय पध्दत अस्तित्वात होती. स्व.वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना त्यांच्या नेतृत्वाखाली 10 ते 15 मंत्री काम करीत होते. त्या कालावधीत 15 वर्षे मंत्री म्हणून त्यांनी काम केलेले आहे. त्या कालावधीत त्यांना निरनिराळया विभागाचे मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी ...

परंतु नगरविकास खात्याचे मंत्री म्हणून त्यांनी दीर्घ काळ म्हणजे सुमारे 4-5 वर्षे काम केले. मघाशी मा.सदस्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे औरंगाबाद विधानसभा क्षेत्रातून ते तीन वेळा निवडून आले होते. औरंगाबाद शहराचे आजचे जे स्वरुप आहे ते स्वरुप बदलण्याच्या दृष्टिकोनातून आणि औरंगाबाद शहराचा विकास झाला पाहिजे या भूमिकेतून त्यांनी जे योगदान दिले ते विसरता येणार नाही. औरंगाबाद शहरामध्ये त्यांनी मौलाना अब्दुल कलाम आझाद नावाची शैक्षणिक संस्था स्थापन केली. मराठवाडयाचा हा भाग नंतर महाराष्ट्राला जोडला गेला. पूर्वी हा भाग निजामाच्या राजवटीखाली होता. त्याठिकाणी रझाकारांची चळवळ सुरु होती. रझाकारांबद्दलचा असणारा संताप लक्षात घेऊन डॉ.झकेरिया यांनी औरंगाबाद शहराचा विकास करुन शैक्षणिक संस्था उभ्या केल्या आणि गरीब मुसलमान ज्यांना शिक्षण मिळत नव्हते अशा समाजातील लोकांना आणि गरीब मुलांना शैक्षणिक सोयी उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत याच उद्देशाने त्यांनी त्याठिकाणी मोठया प्रमाणात शैक्षणिक संस्था उभ्या केल्या. अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून डॉ.झकेरिया हे मूर्तिमंत उदाहरण आहेत. ते मुस्लीम होते. परंतु हिंदू आणि मुस्लीम यांच्यामध्ये एकी राहिली पाहिजे आणि दोन्ही समाजाचे संबंध चांगले राहिले पाहिजे म्हणून त्यांनी खिलाफत चळवळ 1922-23 सालामध्ये सुरु केली. आज सुध्दा या मुंबई शहरामध्ये मोठया आणि भव्य अशा प्रमाणत खिलाफत चळवळ सुरु आहे. खिलाफत भवन येथे निरनिराळे राजकीय नेते या कार्यक्रमासाठी उपस्थित राहतात. हिंदू-मुस्लीम ऐक्य कायम स्वरुपी टिकेल ही भूमिका सातत्याने डॉ.झकेरिया यांनी मांडली. तीन वेळा युनोमध्ये त्यांनी भारताचे प्रतिनिधीत्व केले होते. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. इस्लामसंदर्भात त्यांनी सुधारणावादी भूमिका मांडली. इस्लाम धर्माच्या संदर्भात त्यांनी स्कॉलर म्हणून मान्यता मिळविली होती. 9 जुलै,2005 रोजी मुंबईमध्ये त्यांचे दु:खद निधन झाले. आजच त्यांचे पार्थिव शरीर औरंगाबाद येथे विमानाने नेले जात आहे. मी माझ्या वतीने आणि माझ्या पक्षाच्या वतीने डॉ. झकेरिया यांच्या दु:खद निधनाबद्दल नम्रतापूर्वक नतमस्तक होतो आणि माझी श्रध्दांजली अर्पण करतो.

त्याचप्रमाणे या सदनाचे दुसरे एक माजी सदस्य मरहूम कै.काझी यांनी सुध्दा कॉंग्रेसच्या संघटनेमध्ये काम केले होते. त्या काळात राजकारणामध्ये प्रामाणिकपणाने आणि संघटनेवर निष्ठा ठेवून काम करणा-यांना महत्वाची भूमिका पक्षाच्या माध्यमातून दिली जात असे. राज्यपाल

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी ....

नामनियुक्त म्हणून त्यांना विधानपरिषदेमध्ये काम करण्याची संधी मिळाली होती. कै.काझी सुध्दा आज आपल्यामध्ये नाहीत. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल मी माझ्या पक्षाच्या वतीने त्यांना आदरपूर्वक श्रध्दांजली अर्पण करतो आणि या ठिकाणी जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्याला पाठिंबा देऊन माझे दोन शब्द संपवितो.

-----

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी राज्यातील थोर समाजसेवक आणि सर्व जाती धर्मामध्ये लोकप्रिय असलेल्या डॉ. रफिक झकेरिया यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला आहे त्यास मी पाठिंबा देत आहे.डॉ. झकेरिया हे सामाजिक चळवळीचे प्रणेते होते. त्यांनी यासंबंधी चांगल्या प्रकारे लिखाण करुन आपल्या बुध्दीची चमक देशातच नव्हे तर विदेशात देखील दाखवून दिली होती.

राजकीय क्षेत्रात विशेषत: मंत्री म्हणून राज्य शासनात काम करतांना त्यांनी आपल्या खात्याचा नावलौकिक होईल अशा पध्दतीने काम केलेले आहे. अशा या थोर विचारवंत नेत्याचे दिनांक 9 जुलै 2005 रोजी निधन झाल्याने माझ्या पक्षाच्या वतीने मी त्यांना भावपूर्ण आदराजली अर्पण करीत आहे.

सभापती महोदय, या सदनाचे माजी सदस्य श्री.सलिमुद्दिन काझी यांचेही दिनांक 8 मे 2005 रोजी निधन झाले आहे. ते या सदनाचे सन 1962 पासून 1968 पर्यन्त सदस्य म्हणून कार्यरत होते. त्यांच्या दु:खद निधनाबद्दलही मी माझ्या पक्षाच्या वतीने त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

-------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेन्द्र कवाडे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, माननीय संसदीय कामकाज मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी मरहुम डॉ.रफिक झकेरिया आणि श्री.मरहुम सलिमुद्दिन काझी यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मरहुम डॉ. रफिक झकेरिया यांचे व्यक्तिमत्व अत्यंत लोभसवाणे व आकर्षक असे होते. केवळ राजकारणच नव्हे तर राजकारणाच्याही पलीकडे जाऊन प्रज्ञावंत आणि विचारवंत , व्यासंगी असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. त्यांनी अनेक पुस्तकांचे लेखनही केलेले होते. त्यांचे शिक्षण एम.ए.पी.एच.डी व बार ॲट लॉ पर्यन्त झाले होते. अशा प्रकारे उच्च विद्या विभूषित असे त्यांचे व्यक्तिमत्व होते.औरंगाबाद सारख्या एका मोठया शहरामध्ये विकासाची चॅनल्स आणण्याचे अत्यंत मूलभूत असे कार्य त्यांनी केले होते. विधान परिषदेचे ते नामनियुक्त सदस्य होते त्याचबरोबर औरंगाबाद शहरातून सातत्याने तीन वेळा निवडणूक जिंकून ते विधानसभेमध्ये निवडून आले होते.औरंगाबाद शहराचा सर्वांगीण विकास कसा होईल, या दृष्टिकोनातून त्यांनी अत्यंत मूलभूत काम केलेले होते. केवळ औरंगाबाद शहरातीलच नव्हे, मराठवाडयातीलच नव्हे तर संपूर्ण राज्यातील जनता त्यांचे हे योगदान कधीही विसरु शकणार नाही. आपला मुस्लीम समाज हा प्रचंड गरिबीत आणि हालाखीच्या गर्तेत आहे. हा समाज सुशिक्षित व्हावा, सुसंस्कृत व्हावा यासाठी डॉ.रफिक झकेरिया यांनी मौलाना आझाद या एज्युकेशन ट्रस्टचे चेअरमन म्हणून काम केले होते तसेच औरंगाबाद येथील मौलाना आझाद कॉलेजचे ते संस्थापक सदस्य होते. या संस्थांच्या माध्यमातून डॉ.रफिक झकेरिया यांनी मौलाना आझाद महाविद्यालय आणि इतर अनेक शैक्षणिक संस्था स्थापन करुन मुस्लिम समाज, दलित,आदिवासी, ओ.बी.सी.आणि बहुजन समाजातील मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्याचे अत्यंत पवित्र काम त्यांनी केले होते.ते अत्यंत विव्दान होते. तसेच त्यांनी अनेक ग्रंथाचे लेखनही केले होते. या देशाचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी सलग तीन वेळा युनोमध्ये काम केले होते. हीच त्यांच्या विद्वत्तेची पावती म्हणावी लागेल.हिंदू मुस्लिम यांच्या एकजुटीचा विचार त्यांनी मांडला होता असे अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सागितले आहे. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशात जातीच्या नावाखाली, धर्माच्या नावाखाली विष पेरुन समाजमन तोडण्याचे प्रकार अनेक वेळा केले जातात. अशा वेळी हिंदू मुस्लिम समाज एकत्र कसा राहील, भावा भावा प्रमाणे कसा राहील , नफरतीची भिंत तोडून,दोन्ही

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेन्द्र कवाडे ....

समाजामध्ये सद्भावनेचे वातावरण कसे निर्माण होईल ,या दृष्टिकोनातून त्यांनी अत्यंत मूलभूत स्वरुपाचे काम केले होते.हे मला याठिकाणी प्रकर्षाने सांगावेसे वाटते.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे ....

हिंदू आणि मुस्लिम यांच्याकडे पाहण्याचा डॉ. झकेरिया यांचा दृष्टीकोन जो होता त्याबद्दल मला सांगावेसे वाटते की, मानवी शरीर हे सामंजस्य, समन्वय आणि एकात्मतेचे प्रतिक आहे असे ते मानत होते. जसे माणसाच्या शरीरात डोळे दोन असतात पण दृष्टी एक असते, हात दोन असतात पण टाळी एक वाजते, पाय दोन असतात पण त्याची चाल एक असते त्याप्रमाणे राज्यातील, देशातील मुस्लिम आणि हिंदू हे दोन डोळ्यांप्रमाणे असले तरी त्यांची दृष्टी मात्र एकच असली पाहिजे. दोन हातांची एक टाळी वाजते आणि दोन पाय असले तरी त्यांची चाल मात्र एकजुटीची असते त्याप्रमाणे या दोन धर्मियांचे वागणे असले पाहिजे ही भावना त्यांची होती. असा एकजिनसी, एकात्मिक समाज निर्माण करण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम त्यांनी केले. त्यांच्या इतर कोणत्याही कार्यापेक्षाही त्यांनी हे जे सामाजिक सद्‌भाव निर्माण करण्याचे काम केले आहे ती त्यांची कामगिरी अत्यंत महत्त्वाची आहे असे मी मानतो. ते उपमंत्री राहिले, मंत्री राहिले. त्यांच्या मंत्री पदाच्या काळामध्ये त्यांनी अनेक चांगली चांगली कामे केली. पण राज्यातील सगळ्यात महत्त्वाची बाब म्हणजे सामाजिक सदभावना निर्माण करण्याचे जे काम त्यांनी केलेले आहे ते मला या ठिकाणी प्रकर्षाने नमूद करावेसे वाटते. अशा मरहुम डॉ. रफिक झकेरिया यांच्या निधनाबद्दल आपल्या शोक संवेदना मी येथे व्यक्त करतो.

त्याच बरोबर मरहुम सलिमुद्दीन काझी हेही आपल्या विधान परिषदेतील एक विद्वान व्यक्तिमत्त्व, वकिलीचा गाढा अभ्यास असलेले व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी देखील या सदनातील सदस्य असतानाच्या काळामध्ये अत्यंत महत्त्वाचे असे योगदान दिले आहे. त्यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये या सदनामध्ये केलेले कार्य निश्चितच कोणी विसरू शकत नाही. तेव्हा सन्माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्याला मी समर्थन देतो आणि मरहुम डॉ. रफिक झकेरिया आणि मरहुम सलिमुद्दीन काझी यांना माझ्या तर्फे आणि माझ्या पक्षातर्फे मी श्रद्धांजली अर्पण करतो.

****

...... एन 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कमलकिशोर कदम (नांदेड स्थानिक प्राधिकारी संस्था) : माननीय सभापती महोदय, डॉ. रफिक झकेरिया हे महाराष्ट्रातील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व होते. मराठवाड्याच्या मातीशी त्यांचा ऋणानुबंध होता. इस्लाम धर्मावर अतूट श्रद्धा होती. ते एक गाढे अभ्यासक होते. परंतु सर्व धर्मां बद्दल मनामध्ये अत्यंत आदरभाव असणारे डॉ. झकेरिया हे निधर्मीवादाचे प्रतिक होते. महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री, महसूल मंत्री, नगरविकास मंत्री म्हणून त्यांनी काम केले आहे. अशा प्रकारे अनेक खात्यांमध्ये त्यांनी आपल्या कामाची छाप कायमची उठवली आहे. महाराष्ट्रातील शेतकरी त्यांची आठवण आज अशासाठी काढतो की, या राज्यात पहिल्या प्रथम शेतकऱ्यांसाठी खातेपुस्तिका त्यांनी आणली. 7-12 च्या उताऱ्यासाठी तलाठ्यामागे शेतकऱ्याला कसे फिरावे लागायचे हे त्यांनी पाहिले होते, अनुभवले होते. म्हणूनच महसूल खात्याच्या कारभार हाती घेतल्यानंतर त्यांनी या मुलभूत प्रश्नाला हात घालून शेताची मालकी आणि शेताची कागदपत्रे मिळविण्यासाठी शेतकऱ्याची जी छळवणूक होत होती ती कमी करण्यासाठी, नाहिशी करण्यासाठी पहिले पाऊल टाकले आणि पहिल्या प्रथम महाराष्ट्रात खातेपुस्तिका देण्याची योजना त्यांनी आणली. ...

( यानंतर श्री. जागडे ..... ओ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कमलकिशोर कदम.....

जोपर्यन्त ते महसूल खात्याचे मंत्री होते, तोपर्यन्त त्यांनी ही योजना चांगल्या प्रकारे राबविली. ते नगरविकास खात्याचे मंत्री होते. नवी मुंबई तसेच नवीन औरंगाबाद शहराचे ते शिल्पकार होते. औरंगाबाद शहराला कायम पाण्याचा तुटवडा भासत असे. त्यामुळे त्यावेळी शहरवाढीला मर्यादा येत होत्या. 40 किलोमीटरपर्यन्तची पाईप लाईन टाकून जायकवाडी धरणातील पाणी औरंगाबाद शहरासाठी आणून त्यांनी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा सोडविला. औरंगाबाद शहराला ऐतिहासिक असे महत्व आहे. औरंगाबाद शहराला जगाच्या पर्यटनाच्या नकाशावर कायमचे स्थान देण्याचे काम डॉ. झकेरिया यांनी केले. औरंगाबादमध्ये विमानतळाची निर्मिती करुन राज्यातील महत्वाचे असे शहर निर्माण करण्याचे काम डॉ. झकेरिया यांनी केले. रामा इन्टरनॅशल हॉटेल, ताज हॉटेल इ. पंचतारांकित हॉटेल्स त्यांनी औरंगाबाद शहरात आणली. औरंगाबाद शहराच्या आधुनिकीकरणासाठी ज्या ज्या गोष्टी करणे शक्य होत्या, त्या त्या सगळ्या गोष्टी डॉ. झकेरिया यांनी केल्या. औरंगाबाद शहराला आधुनिक करण्याचा मान डॉ. झकेरिया यांच्याकडे जातो. ते उत्कृष्ट प्रशासक होते. डॉ. झकेरिया यांना अरबी, उर्दु, हिन्दी, इंग्रजी इ. अनेक भाषा येत होत्या. सर्व भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांनी इंग्रजी भाषेतून जे जे लिखान केले, ते अतिशय गाजले आहे. टाईम्स ऑफ इंडियात त्यांनी पत्रकार म्हणून काम केले आहे. उत्कृष्ट पत्रकार म्हणून ते गाजले होते. नियोजनाची दूरदृष्टी, उत्कृष्ट प्रभावी नेतृत्व त्यांच्याकडे होते. ते आज आपल्यात नसल्यामुळे औरंगाबाद मधील जनतेला त्यांची सतत आठवण होत आहे. माननीय यशवंतराव चव्हाण यांनी औरंगाबादला दिलेली अमुल्य अशी भेट होती. माननीय यशवंतराव चव्हाण यांना डॉ.झकेरिया यांनी जी जी आश्वासन दिली होती, त्यांची त्यांनी पूर्तता केली आहे. माननीय यशवंतराव चव्हाण यांनी दाखविलेला विश्वास त्यांनी सार्थ ठरविला. मराठवाड्यातील प्रत्येक माणसाला त्यांच्याबद्दल कायम आदर राहील. डॉ. झकेरिया यांना मी मनापासून श्रध्दांजली अर्पण करतो.

दुसरे माननीय सदस्य श्री. मरहुम सलिमुद्दीन काझी. त्यांचे प्रिय नाव काझी सलिम असे होते. श्री. काझी हे व्यवसायाने वकील असतानासुध्दा उत्कृष्ट शाहीर होते. ते अतिशय विद्वान होते तसेच निधर्मीवादाचे प्रतिक होते. मुस्लीम समाजामध्ये किती सुसंस्कृत माणसे आहेत, हे या दोन सदस्यांकडे पाहिल्यानंतर दिसून येईल. त्यांच्याकडे पाहिल्यानंतर आपल्या संस्कृतीचे आदानप्रदान

..2..

श्री. कमलकिशोर कदम......

झाल्याचे दिसून येते. श्री. काझी यांनी साहित्यिक विश्वामध्ये फार मोठी भर घातली आहे. त्यांच्या जाण्यामुळे मराठवाड्याचे तसेच महाराष्ट्राचे नुकसान झाले आहे. मी या दोन्ही सदस्यांना आदरांजली अर्पण करतो.

--

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : संसदीय कामकाज मंत्री माननीय श्री. हर्षवर्धन पाटील यांनी या सदनासमोर जो दुखवटयाचा प्रस्ताव मांडला आणि दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांनी या ठरावाला पाठिबा दिला त्यावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. मरहुम डॉ. रफिक झकेरिया हे खऱ्या अर्थाने महाराष्ट्रामध्ये जन्मलेले राष्ट्रीय पातळीवरील सर्व धर्म समभाव आणि निधर्मी विचारांचा पुरस्कार करणारे व्यक्तिमत्व होते, हे सांगतांना महाराष्ट्रातील सर्व जणांना आणि विशेषत: या सदनातील सन्माननीय सदस्यांना सुध्दा फार मोठा अभिमान वाटतो. संपूर्ण राष्ट्रामध्ये त्यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्याचा विचार सातत्याने जोडण्याचा प्रयत्न केला. त्या अनुषंगाने देशामध्ये आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये सुध्दा त्यांनी अनेक माध्यमातून ही मूलभूत शिकवण देण्याचा प्रयत्न केला. मरहूम डॉ. रफिक झकेरिया यांनी "ए स्टडी ऑफ नेहरु", "राईज ऑफ मुस्लीम्स इन इंडियन पॉलिटिक्स", "कॉन्फ्लिक्ट बिटवीन रिलिजन ॲन्ड पॉलिटिक्स", "इंडियन मुस्लिम्स : व्हेअर हॅव दे गॉन रॉंग" अशापध्दतीची जी पुस्तके लिहिली ती फार मोठया प्रमाणात विशेषत: देशात व महाराष्ट्रात गाजली. डॉ. रफिक झकेरिया हे 1960 ते 62 या दरम्यान या सदनाचे नामनियुक्त सदस्य होते. त्यानंतरच्या काळात 1962, 1967 व 1972 असे तीन वेळा औरंगाबाद व औरंगाबाद पश्चिम या मतदारसंघामधून त्यांनी विधानसभेवर प्रतिनिधीत्व केले होते. 1978 ते 1984 या काळात ते राज्यसभेचे सदस्य होते. विधानसभा आणि विधान परिषदेचे सदस्य असतांना महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात त्यांनी जवळ जवळ 15 वर्षे विविध खात्याचे मंत्री म्हणून काम केले आहे. आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये, युनोसारख्या जागतिक व्यासपिठावर आपल्या देशाचे तीन वेळा प्रतिनिधीत्व करण्याचा मान या महाराष्ट्राच्या सुपुत्राला मिळाला. त्या दृष्टीने मी सांगेन की, डॉ. रफिक झकेरिया यांच्या रुपाने अत्यंत अभ्यासू व्यक्तिमत्व महाराष्ट्राला मिळाले. त्यावेळच्या मुंबई राज्यामध्ये एम.ए. च्या परिक्षेमध्ये पहिला येण्याचा मान त्यांना मिळाला. त्यानंतरच्या काळात त्यांनी पी.एच.डी. करुन महाराष्ट्रामध्ये एक कायदेतज्ज्ञ म्हणून आपले व्यक्तिमत्व निर्माण केले. अशा परिस्थितीत आपल्यावर या समाजाचे असलेले ऋण या भावनेतून त्यांनी हिंदू-मुस्लिम समाजामध्ये जीवंत ऐक्य नांदण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले हे महाराष्ट्रामध्ये तुम्हाला-आम्हाला कुणालाही विसरता येणार नाही. एका बाजूला या दोन समाजामध्ये फार मोठी सामाजिक दरी निर्माण होते की काय? अशी भिती वाटत असतांना यत्किंचितही अशापध्दतीची दरी वाढू नये यासाठी

**मा. साभपती**....

काळजीपूर्वक प्रयत्न करणारा हा एक विचारवंत आपल्यातून गेला असे डॉ. रफिक झकेरिया यांच्या बाबतीत आपल्याला म्हणावे लागेल.

त्यांनी दिलेली शिकवण या पुढील काळात महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या हजारो कार्यकर्त्यांनी सातत्याने जपायची ठरविली तर खऱ्या अर्थाने सर्व धर्म समभाव या विचारांची नवी उमेद, इर्षा महाराष्ट्रातील सर्वसामान्यांच्या मनात तयार होऊ शकेल. खऱ्या अर्थाने त्याची आज या राज्याला गरज आहे. पारतंत्र्यांच्या आक्रमणाचा धोका रोखायचा असेल तर या महाराष्ट्रात, देशात रहाणाऱ्या सर्व जाती पंथाच्या बंधू-भगिनींनी एकत्र राहिले पाहिजे हे धोरण त्यांनी शिकविले. हे धोरण सातत्याने या पुढील काळात कसे टिकून राहील या अनुषंगाने आपण प्रयत्न केले पाहिजेत. आपल्यामधून ते अचानक गेले म्हणून मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

श्री. मरहुम सलिमुद्दीन काझी हे सुध्दा एक आगळे वेगळे असे व्यक्तिमत्व त्याच औरंगाबाद शहराने महाराष्ट्राला दिले. दोन वेळा ते या विधानपरिषद सभागृहाचे सदस्य होते.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती . . . .

त्यानंतरच्या काळात ते लोकसभेचे खासदारही होते. विशेषत: रझाकारांच्या नंतरच्या महाराष्ट्राचा आणि त्यातल्यात्यात मराठवाडयाचा जेव्हा आपण विचार करतो, तेव्हा औरंगाबाद शहरातून जी ठेव मिळाली, त्यामध्ये मरहुम डॉ.रफिक झकेरियासाहेब आणि मरहुम सलिमुद्दीन काझीसाहेब आहेत. या दोघांनी आयुष्यभर दोन्ही समाजामध्ये ऐक्य साधण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये औरंगाबाद असो किंवा मराठवाडा असो, त्यांनी या संपूर्ण क्षेत्रातील हिंदू-मुस्लीम समाजामध्ये अत्यंत चांगल्या पध्दतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. एक अत्यंत उत्कृष्ट समाजसेवक या अनुषंगाने त्यांनी आपले काम केले आहे. या दोन्हीही विचारवंतांच्या, मान्यवरांच्या निधनामुळे जी पोकळी निर्माण झालेली आहे, ती सहजासहजी भरुन येणार नाही. मी त्यांच्या स्मृतीस वंदन करतो.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल. आता प्रथेप्रमाणे सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांसाठी तहकूब करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक 3 वाजून 47 मिनिटांनी, 10 मिनिटांसाठी तहकूब झाली.)

-----

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

**(सभापतीस्थानी मा.उपसभापती)**

**289 अन्वये प्रस्तावाबाबत.**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी 289 अन्वये एक प्रस्ताव दिलेला आहे. राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या बोनसच्या दुसऱ्या हप्त्याचे जवळपास 1 हजार कोटी रुपये महाराष्ट्र सरकारने अजून दिलेले नाहीत. मागच्या अधिवेशनामध्ये हे पैसे तीन दिवसात देऊ, एक महिन्यात देऊ, अधिवेशन संपेण्याच्या अगोदर देऊ, असे सरकारच्या वतीने मंत्री महोदयांनी सांगितले. मा.मुख्यमंत्र्यांनी त्यावेळेस अधिवेशन संपल्यावर 30 तारखेला देऊ अशापध्दतीने या राज्यातील शेतकऱ्यांना खोटी आश्वासने दिलेली आहेत. सभापती महोदय, मागचे अधिवेशन संपले आता पावसाळा सुरु होऊन दीड महिना झालेला आहे. आता जुलै महिना सुरु झालेला आहे. अजूनही कापूस उत्पादक शेतकऱ्याला बोनसचा एक नया पैसासुध्दा मिळालेला नाही. याचा परिणाम असा झाला की, गेल्या दीड महिन्यापासून या राज्यामध्ये जवळपास 16 जिल्ह्यांमध्ये पावसाचे प्रमाण अतिशय कमी झालेले आहे. एवढेच नव्हे तर 11 जिल्ह्यामध्ये पाऊसच पडलेला नाही. अशावेळेस बियाणे, खते घेण्यासाठी, बँकेचे कर्ज फेडण्यासाठी शेतकऱ्याजवळ पैसे नाहीत. एका बाजूला शासनाकडे पैसे आहेत परंतु शेतकऱ्याकडे बी-बियाणे घेंण्यासाठी पैसे नाहीत. त्यामुळे शेतकरी आत्महत्त्या करीत आहेत. दुबार पेरणी करण्यासाठी खते, बियाणे घेण्यासाठी शेतकऱ्यांकडे पैसे नाहीत, बँकेच्या कर्जाचे संकट आहे. अशा अवस्थेमध्ये या सरकारने शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केलेले आहे. सरकारने आश्वासने दिली पण ती पाळली नाहीत. मागच्या अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांना 10 हजार रुपये हेक्टरी मदत देण्याचे आश्वासन दिलेले होते.

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

कोकणातील आंबा उत्पादक शेतक-यांना अद्याप एक पैसाही शासनाने नुकसानभरपाई दिलेली नाही.चंद्रपूर, भंडारा, गोंदिया आणि कोकणातील भात उत्पादक प्रदेशासाठी, त्यावेळचे माननीय मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी 20 कोटी रुपयाची मदत त्यावेळी सदनात जाहीर केली होती. पण अद्यापपर्यंत त्या भात उत्पादक शेतक-यांना पाच ते सहा कोटी रुपये मिळालेले नाहीत. या सर्व पार्श्वभूमीतून आज या ठिकाणी विधिमंडळाचे अधिवेशन सुरु होत आहे, म्हणून या राज्यातील कापूस उत्पादक, आंबा उत्पादक तसेच भात उत्पादक शेतक-यांच्या प्रश्नावर या सभागृहात प्रथम चर्चा व्हावी. सभागृहाचे आजचे सर्व कामकाज बाजूला सारुन, या प्रस्तावावरील चर्चा घ्यावी, अशा प्रकारची आमची या ठिकाणी मागणी आहे. सभापती महोदय, ही मागणी आपण मान्य करावी, अशा प्रकारची आपल्याला आग्रहाची विनंती आहे.

....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MHM/ प्रथम श्री. किल्लेदार.. 16:00

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या राज्यातील विदर्भ आणि मराठवाडयातील कापूस उत्पादक शेतक-यांचा हा तातडीचा प्रश्न आहे. तसाच तो कोकणातील आंबा उत्पादक शेतक-यांचाही प्रश्न आहे. कोकणातील शेतक-यांच्या हातात बाट्टया देऊन त्यांना मोकळे करुन टाकलेले आहे. सभापती महोदय, शासनाने या सभागृहामध्ये छातीवर हात ठेवून जोरात सांगितले होते की, कापूस खरेदीची हमी रक्कम पंधरा दिवसात देऊ. तसे रेकॉर्ड आहे. अग्रिमाची रक्कम दोन हप्त्यात दिली जाईल. पहिला हप्ता जून महिन्यामध्ये आणि दुसरा हप्ता ऑक्टोबर महिन्यामध्ये दिला जाईल असे शासनाने सांगितले होते. त्यावेळी आम्ही बाके वाजवून शासनाचे या सभागृहात स्वागत केले होते. कापूस उत्पादक शेतक-यांना जगविण्यासाठी शासनाने तो निर्णय घेतलेला होता. त्या आधी, या सदनाच्या सत्ताधारी सदस्यांना राजीनामा देण्याची वेळ आली होती.आम्ही त्यावेळी प्रतिष्ठा केली नाही. आणि श्री. जयंत पाटील, श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी आपल्या सहका-यांना वाचविण्यासाठी मध्यस्थी केली नसती तर सरकार कोसळले असते. सभापती महोदय, वाईट एवढेच वाटते की, यासंदर्भात शासनाने एक वर्ष आगोदर शब्द दिलेला आहे. जून महिन्यात अग्रिमाचा पहिला हप्ता देऊ असे कबूल केले होते.यासंदर्भातील बाकीचे सगळे मुद्दे आम्ही हा विषय चर्चेला येईल त्या वेळी मांडू. या सरकाला या आश्वासन पूर्ततेची आठवण व्हावी, म्हणून मी विदर्भात "आठवण" आंदोलन केले. मोर्चे काढून शासनला निवेदन दिले की, अग्रिमाचा पहिला हप्ता जूनमध्ये मिळाला पाहिजे. सभापती महोदय, या मागणीसाठी आम्ही आंदोलन केले, मोर्चे काढले, रस्त्यावर उतरलो. काल माननीय पणन मंत्री आम्हाला भेटले व त्यांनी सांगितले की, तुम्ही हे कशासाठी करता? पावसाळी अधिवेशनात यासंदर्भात पुरवणी मागणी आहे. 80 कोटी रुपयाची व्यवस्था झालेली आहे. बाकीचे पैसे बँक देत नाही, असे त्यांनी सांगितले. पण तो विषय आमचा नाही. प्रामुख्याने आमची मागणी अशी होती की, अर्थसंकल्पात, यासाठी पैशाची तरतूद करण्यात यावी व शासनाने आश्वासन दिल्याप्रमाणे, कबूल केल्याप्रमाणे जून महिन्यामध्ये, अग्रिमाचा पहिला हप्ता द्यावा. जून महिन्यामध्ये खरीप हंगामामध्ये शेतक-यांचा जीवनमरणाचा प्रश्न असतो. माननीय विरोधीपक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे, खरीपाचा हंगाम सुरु झाल्यानंतर, शेतीच्या खर्चाकरिता शेतक-यांना पैशाची आवश्यकता असते. शासनाने अग्रिमाचा पहिला हप्ता देतो, असे सांगितले असतांना, आज जुलै महिना आलेला आहे. अधिवेशन सुरु झालेले आहे. पण सरकारला अजूनही

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

त्याबाबत काहीही वाटत नाही. अधिवेशन सुरु होण्यापूर्वी सरकारला एक प्रकारचा धाक असतो की, आता अधिवेशन सुरु होणार आहे. अधिवेशन सुरु होण्यापूर्वी काही तरी केले पाहिजे. नाही तर हा प्रश्न अधिवेशनात उपस्थित केला जाईल. अधिवेशन सुरु झाल्यानंतरही, शेतक-यांचे पैसे दिले जाणार नसतील तर आम्हाला रस्त्यावर उतरावे लागले, आंदोलन करावे लागेल. मग परत शासन आमच्यावर खटले भरणार. ते खटले चालू राहणार. सभापती महोदय, या सदनाचे आजचे इतर कामकाज थांबवून या विषयावर चर्चा करावी, आणि कापूस उत्पादक शेतक-यांना जूनमध्ये पहिला हप्ता देण्याचे शासनाने जे कबूल केलेले आहे, त्याप्रमाणे तो पहिला हप्ता कधी देणार ते शासनाने सांगावे? कोकणातील आंबा उत्पादक शेतक-यांची झालेली नुकसानभरपाई तातडीने कधी देणार ते शासनाने आता सभागृहात सांगावे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

धानाला योग्य भाव देऊ असे सांगावे. हे सर्व जण चंद्रपूर, गडचिरोलीला गेले होते. वाईट एवढेच वाटते की, जिल्हा परिषदेच्या निवडणुकीला माननीय मुख्यमंत्री जातात, जिल्हा परिषदेच्या निवडणुकीला राष्ट्रवादीचे माननीय उपमुख्यमंत्री जातात. दोघे एकमेकांच्या समोर लढतात. धानाला एक हजार रुपये भाव देऊ असे सांगतात. पण जे भाव आहेत ते तरी द्या. त्याबाबतीत सभागृहात सांगा, अशी आमची आग्रही भूमिका आहे. म्हणून सदनाचे आजचे इतर कोणतेही कामकाज न करता याच विषयावर तातडीने चर्चा घडवून आणावी अशी मी आग्रही भूमिका मांडतो. या चर्चेमध्ये या सरकारचे यासंदर्भातील कोणते पैलू आहेत तसेच शेतकऱ्यांच्या काय व्यथा आहेत त्या जरुर मांडू एवढेच आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

**उपसभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय सदस्यांना मी विनंती करु इच्छितो की, या चर्चेला निश्चितपणे याच अधिवेशनामध्ये परवानगी दिली जाईल. आपण त्याबाबतीत रीतसर नोटीस द्यावी.

श्री. पांडुरंग फुंडकर : माननीय मुख्यमंत्र्यांनी मागच्या अधिवेशनामध्ये सांगितले होते की, 30 तारखेपर्यन्त पैसे देऊ....

**उपसभापती** : मी आपल्याला विनंती केली आहे त्याप्रमाणे आपण रीतसर नोटीस द्यावी. आपल्याला परवानगी देण्यात येईल. आता मी पुढचे कामकाज पुकारतो.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात )

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT

**पृ.शी./मु.शी.**: अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

डॉ. राजेंद्र शिंगणे ( महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 213 (2) (अ) अन्वये सन 2005 चा अध्यादेश क्रमांक 2 - मुंबई मुद्रांक (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री. दयानंद मस्के ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 213 (2) (अ) अन्वये सन 2005 चा अध्यादेश क्रमांक 3- महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) (भूतलक्षी प्रभावाने मुदतवाढ व सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री. दिलीप वळसे-पाटील ( ऊर्जा (अपारंपारिक ऊजा वगळता) मंत्री ) : सभापती महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 213 (2) (अ) अन्वये सन 2005 चा अध्यादेश क्रमांक 4- विद्युत (महाराष्ट्र सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT

**पृ.शी./मु.शी.**: विधेयकांना संमती व अधिसंमती.

**उपसभापती** : विधान परिषदेने पारित केलेल्या पुढील विधेयकांना विधानसभेकडून संमती मिळाल्याची आणि दोन्ही सभागृहाव्दारे पारित केलेल्या विधेयकांना राज्यपाल व राष्ट्रपती यांची अधिसंमती मिळाल्याची यादी सचिव वाचून दाखवतील.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी. )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री विनोद तावडे व इतर सन्माननीय सदस्य यांनी " दिनांक 9 जुलै, 2005 च्या सुमारास यवतमाळ जिल्हयातील नांदगव्हाण येथील धरणाची भिंत सततच्या पावसामुळे फुटल्याने पुरामध्ये सुमारे 13 व्यक्ती मरण पाऊन अनेक व्यक्ती वाहून जाणे, पुरग्रस्तांना तात्काळ मदत करण्याची आवश्यकता " याबाबत नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. हा नियम 93 चा विषय होऊ शकत नाही. शासनाने याबाबत त्वरित निवेदन करावे असे निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री विनोद तावडे व इतर सन्माननीय सदस्य यांनी "महाराष्ट्रात कोळशासाठी उपलब्ध असलेल्या 24 खणन पट्टया राज्य शासनाने तसेच वीज मंडळाने भाडेपट्टयावर घेण्यास केलेली दिरंगाई, सदर खणनपट्टया अन्य राज्यांनी घेतल्यामुळे राज्याच्या वीज निर्मितीवर झालेला विपरीत परिणाम" याबाबत नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. हा नियम 93 चा विषय होऊ शकत नाही. शासनाने याबाबत निवेदन करावे असे निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री व्ही.यू. डायगव्हाणे व इतर सन्माननीय सदस्य यांनी "राज्यातील खाजगी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांमधील कर्मचाऱ्यांना गेले 3 महिन्यांचे वेतन अतिविलंबाने मिळणे, अनियमित वेतनामुळे राज्यातील संपूर्ण शालेय शिक्षण विभागात पसरलेला असंतोष" याबाबत नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. हा नियम 93 चा विषय होऊ शकत नाही. शासनाने याबाबत गांभीर्याने लक्ष घालावे असे निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर व इतर सन्माननीय सदस्यांनी " जय भारत महिला सेवा संस्था, नागपूर संचलित उज्वल माध्यमिक विद्यालय, कबीर नगर, नागपूर या शाळेवर श्री. किशोर मसुरकर यांची बनावट व खोटे दस्तऐवज तयार करुन मुख्याध्यापक म्हणून केलेली नियुक्ती, यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेली संतापाची लाट" याबाबत नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. हा नियम 93 चा विषय होऊ शकत नाही. शासनाने याबाबत निवेदन करावे असे निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT

**पृ. शी.** : विद्युत ( महाराष्ट्र सुधारणा ) विधेयक.

L.C. BILL NO. XVI OF 2005.

(A BILL TO AMEND THE ELECTRICITY ACT, 2003, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. दिलीप वळसे-पाटील ( ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळता) मंत्री ) : सभापती महोदय, सन 2005 चे वि. प. वि. क्रमांक 16- विद्युत अधिनियम, 2003, महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि. प. वि. क्रमांक 16 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-----

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT

**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय कामकाजासंबंधी.

**उपसभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेले अशासकीय कामकाज पुढे घेण्यात येईल.

-----

**उपसभापती** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 12 जुलै, 2005 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 4 वाजून 09 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 12 जुलै, 2005 च्या दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही